# महात्मा गांधी विचारातील सर्वोदय

**प्रा. डॉ. रविंद्र भणगे** प्राध्यापक, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सर्वोदय हे गांधी विचारधारेचे अंतीम साध्य आहे. जैन मुनी आचार्य सामंतभद्र यांच्या लेखनातून महात्मा गांधीनी सर्वोदय शब्द स्वीकारला आणि माझे सत्याचे प्रयोग या आपल्या आत्मकथेत त्यांनी त्याचा प्रथम उल्लेख केला. रस्किन यांच्या 'अन टु धीस लास्ट' ग्रंथाचा गुजराती अनुवाद करताना महात्मा गांधीनी त्या पुस्तकाचे शिर्षक म्हणून 'सर्वोदय' शब्दाचा वापर केला. गांधीजींवर या पुस्तकाचा प्रचंड प्रभाव पडला. यात रस्किन यांनी तीन तत्वे प्रतिपादित केली.

1. सर्वांच्या कल्यानातच आपले कल्याण आहे.
2. प्रत्येकाच्या कार्याचे समान मूल्य असले पाहिजे, कारण प्रत्येकाला जगण्याचा समान हक्क आहे.
3. श्रमिक जीवनालाही प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे.

या तीन सिद्धांताच्या बरोबरीने व गांधीजींवर पडलेल्या वेगवेगळ्या विचारवंत, धार्मिक ग्रंथ, चळवळी, विचारसरणी यांच्या आधारे महात्मा गांधींनी सर्वोदय विचार संकल्पना अधिक विकसित करण्याचा प्रयत्न केला. प्राणनाथी संप्रदायाचा प्रभाव, केक्कर चळवळीचा प्रभाव, श्रीमद् रामचंद्र यांचा प्रभाव, तुलसीदास, भगवद्गगीतेचा, महाभारत, जैन सुत्रे, जैन धर्म, हिंदू धर्म, बौद्ध धर्म, पारशी धर्म, कन्फ्यूशियस तत्वज्ञान, इस्लाम धर्म, ख्रिश्चन धर्म, पडलेल्या प्रभावातून सर्वोदय संकल्पना विकसित झाली आहे. त्याचबरोबर सर्वोदय विचाराच्या संकल्पनेवर प्लेटो, जॉन लॉक, जे. एस. मिल, हर्बर्ट स्पेन्सर यांचादेखील प्रभाव आढळतो. गांधीजींच्या सर्वोदय संकल्पनेवर इंग्लंडमधील विचारांचा देखील प्रभाव पडला.

**गांधी विचारसरणीतील सर्वोदय:**

आधुनिक समाजा समोरील सामाजिक, राजकीय आणि अर्थीक समस्यांच्या सोडवणूकीसाठी गांधी विचारसरणीचा अवलंब करणे म्हणजे सर्वोदय होय. समाजात उपलब्ध असलेल्या भौतिक, आर्थिक व आध्यात्मिक साधनांचा सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टीने अधिकाधिक उपयोग करण्याचे सर्वोदय एक शास्त्र आहे. सर्वोदयात प्रत्येकाचे व सर्वांचे कल्याण, अभ्युदय अपेक्षित आहे. माणूस हा मूलता व स्वभावतः निस्वार्थी सदाचारी आहे सहकारी, परोपकारी व शांतताप्रेमी आहे असे सर्वोदयात गृहीत धरले आहे.

सर्वोदय या संकल्पनेला गांधीजींनी भारतीय तत्त्वाच्या आधारे विकसित केले. गांधीजी सर्वोदय विचारांचा पाया एकादश व्रत्ते मानतात. सत्य, अहिंसा, निर्भयता, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, वैराग्य, आत्मत्याग, अभय, शरीरश्रम, स्वदेशी, आत्मनिर्भरता, अस्पृश्यता निवारण या व्रतावर सर्वोदय विचार आधारलेला असेल असे गांधीजी स्पष्ट करतात. सर्वोदय आर्थिक व्यवस्था ही अहिंसात्मकतेवर आधारलेली असेल. त्याचबरोबर मानवतावाद, न्यायपूर्ण मजुरी, या घटकांना देखील गांधीजी प्राधान्य देतात. विश्वस्त सिद्धांत ही गांधीजींनी सर्वोदय विचारांमध्ये विकसित केलेली संकल्पना असून विकेंद्रीकरणावर ते अधिक भर देतात. गांधी मानवाला बेकार करेल असे यांत्रिकीकरण नाकारतात. गांधीनी एकादश व्रतांमध्ये अधिक भर टाकली. यामध्ये गांधीजी स्त्रीयांची सेवा, नई तालीम, आरोग्य व स्वच्छतेचे शिक्षण, प्रांतीय भाषा, राष्ट्रभाषा, आर्थिक समानता, शेतकरी, मजूर, आदिवासी, महारोगी, या घटकांच्या सेवेचा समावेश करतात. सर्वोदयात गांधींना अपेक्षित असलेली राज्यव्यवस्था त्यांनी 'हिंद- स्वराज्य' या पुस्तकांमध्ये 1909 मध्ये स्पष्ट केलेली आहे. गांधी आणि अहिंसक समाजाची निर्मिती हे आपले ध्येय आणि उद्दिष्ट मानत असत. लोकजीवन हे दैनंदिन व्यवहारात अहिंसात्मक व्यवस्थेचे कोंदण आवश्यक आहे, असे स्पष्ट करत. अहिंसक समाज निर्मितीसाठी पूरक अशी उत्पादनव्यवस्था, वितरणव्यवस्था, तंत्रव्यवस्था गांधींना अपेक्षित होती. त्यासाठी गांधी अहिंसाधिष्टीत समाजरचनेची मांडणी करतात. गांधीजींच्या मते स्वराज्य ही इंग्रजांची नक्कल करणारे असून चालणार नाही. संघर्ष स्पर्धा आणि द्वेष यावर आधारलेली आधुनिक संस्कृती ऐवजी सहिष्णुतेचा सहकार्य, सर्वसमावेशकतेचा व सहजीवनाच्या आधारावर विकसित झालेल्या संस्कृतीवर गांधीजींना स्वराज्य अपेक्षित होते. गांधीजींच्या मते, लोकशाहीचा अर्थ सर्वांच्या कल्याणाकरिता सर्व वर्गातील लोकांची भौतिक, आर्थिक व आध्यात्मिक संसाधने जुळवण्याची कला आणि विज्ञान असा असला पाहिजे. विकासाची समान संधी प्रत्येक नागरीकाला प्राप्त झाली पाहिजे, प्रत्येक व्यक्तीमध्ये बंधूभाव निर्माण झाला पाहिजे, व्यक्तीमध्ये अनुशासन व विनम्रता असणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये राजकीय व्यवस्था कशी असेल यासंदर्भात गांधीजींनी विवेचन केले आहे. सर्वोदयी रचना निर्माण करण्यासाठी गांधीजी निस्वार्थी समाजसेवकांची अपेक्षा करतात. यासाठी रचनात्मक कार्य करणाऱ्या देखील संघटना ते निर्माण करतात. अखिल भारतीय चरखा संघ, अखिल भारतीय खादी ग्रामोद्योग संघ, हिंदुस्तानी तालिमी संघ,

हरिजन सेवक संघ, गोसेवा संघ अशा कार्य करणाऱ्या संघाची निर्मिती करू इच्छित होते. गांधी ग्रामउद्योगाद्वारे भारतीय अर्थव्यवस्था विकसित करू पाहत होते. ग्रामउद्योगांमध्ये गांधीजी वेगवेगळे व्यवसाय विकसित करतात. त्याआधारे ग्रामीण भागातील दारिद्र्य दूर करू इच्छित होते. गांधीजी आपल्या सर्वोदय विचारांमध्ये पर्यावरणात्मक विचारांचा देखील समावेश करतात. निसर्गातील साधन संपत्तीपासून पशु, पक्षी व मानव यांना अत्यावश्यक वस्तू मिळवण्याचा समान अधिकार आहे अशी भूमिका घेतात. न्याय, स्वातंत्र्य, समता या मूल्यांच्या आधारावर मानवी हक्काच्या विचार करून पर्यावरणाचा योग्य वापर केला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. गांधीजी सर्वोदय राज्यव्यवस्थेतील अन्याय निवारण्याची पद्धत सत्याग्रह ही विकसित करतात. गांधी पाश्चात्य पॅसिव्ह रेझिस्टन्स ही संकल्पना आत्मबळाच्या आधारावर विकसित करतात तसेच गांधीजी सत्याग्रहात सामुदायिक सत्याग्रहा पेक्षा वैयक्तिक सत्याग्रह श्रेष्ठ अशीही भूमिका घेतात.

महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार हे सामाजिक, राजकीय क्षेत्रातील विचारांशी सुसंगत होते. लहान गटांची स्वायत्त व व्यक्तींच्या सहकार्यावर चालणाऱ्या वसाहतींचा त्यांनी पुरस्कार केला होता. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेमध्ये असताना विविध समूहांच्या सहकार्यावर आधारलेल्या राजकीय व्यवस्थेचा प्रयोग केला होता. भारतात आल्यानंतर भारतातील सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर गांधींना असे लक्षात आले की, खेडी स्वयंपूर्ण झाली तर नव्या विकेंद्रित अर्थव्यवस्थेचा ते पाया बनू शकतील. गांधीजींच्या मते, जर भारताला आपला विकास अहिंसेच्या दिशेनं करावयाचा असेल तर बहुतांश गोष्टींचे विकेंद्रीकरण करावे लागेल. केंद्रीकरण्याचा मार्ग जर अवलंबला तर उत्पादक वस्तूंच्या संरक्षणासाठी हिंसेचा मार्ग अवलंबावा लागेल. गावांना केंद्रीभूत ठेवून जर वेगवेगळ्या गावांमध्ये उद्योगधंद्यांची उभारणी केली तर त्याच्या संरक्षणाची फारशी काळजी घेण्याची गरज राहणार नाही. शहर केंद्रस्थानी ठेवून उद्योगधंद्याची उभारणी केल्यास विदेशी आक्रमणाचे संकट कायम राहील असे गांधी स्पष्ट करतात.

महात्मा गांधीनी हिंदस्वराज्य हा ग्रंथ 1909 मध्ये लिहिला. या ग्रंथाची तीस वर्षांनी पुनरावृत्ती काढत असताना गांधीजी म्हणतात की, माझ्या विचारांमध्ये यत्किंचितही फरक पडलेला नाही. शरीरश्रम, साधी राहणी, ग्रामोद्योग, विकेंद्रीकरण, स्वायत्त व स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था याच्यावरील विश्वास मृत्यूपर्यंत कायम राहिल. यावरून गांधी यांचा विकेंद्रीकरण व्यवस्थेवरील विश्वास स्पष्ट होतो. गांधींनी कुटिर उद्योगाचा जो पुरस्कार केला त्याच्यामागे बेकारी निवारणा बरोबरच आर्थिक सत्तेच्या विकेंद्रीकरणाची कल्पना होती. त्याच्या मते, सृजनशीलता आणि कार्यकौशल्यामुळे व्यक्तिमत्त्वाची वाढ होते. कारखाणदार कामगारांच्यामध्ये सृजनशीलता व कार्य कौशल्यतेला वावं नसल्यामुळे त्यांची व्यक्तिमत्त्वाची वाढ खुंटते. तसेच कारखान्यांकडून कामगारांची पिळवणूक होते. उत्पन्नाच्या वाटणीतील विषमता वाढते आणि फारच थोड्या लोकांच्या हातात आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होते, असे गांधीजींचे मत आहे. कुटीर उद्योगांना सहाय्यभूत होतील अशा तंत्रांचा म्हणजेच यंत्रांचा वापर करण्यास गांधीजींची हरकत नव्हती. ग्रामोद्योगाच्या आधारित उद्योगांची उभारणी करण्याचा गांधी आग्रह धरतात. विधायक कार्यक्रमाच्या आधारावर गांधी विकेंद्रीत विकास घडवून आणू इच्छित होते. त्यांच्यामते, मनुष्य कितीही मोठा विचारवंत असला तरी त्याला शारीरिक गरजा असतात व त्या भागवण्यासाठी प्रत्येकाने शारीरिक श्रम केले पाहिजे. गांधी आर्थिक समतेचा आग्रह धरतात. कारखानदारीच्या आधारावर अहिंसा निर्माण होऊ शकत नाही, कारण त्यामध्ये शोषण सामावलेले आहे. परंतु ग्रामोद्योगाच्या आधारावर स्वावलंबी आर्थिक रचना निर्माण होऊ शकते. त्या रचनेमध्ये शोषणाला स्थान नसेल आणि जिथे शोषण नसेल तिथे हिंसेला स्थान असणार नाही. तो अहिंसक समाज असेल असे गांधी स्पष्ट करतात.

महात्मा गांधी पंचायतराज द्वारे आर्थिक आणि राजकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे समर्थन केले आहे. गांधी पंचायत राजद्वारे केवळ गावांचा सामाजिक-आर्थिक विकास साधने हा त्यांचा उद्देश नव्हता, तर विदेशी आक्रमण देखील टाळण्यास पंचायत राजव्यवस्था उपयुक्त ठरेल असे त्यांचे मत होते. गांधी विकेंद्रित अर्थव्यवस्थेचा स्वीकार करतात कारण त्यांच्यामते, आजची अर्थव्यवस्था ही भोगवादावर व अनितीमान व्यवस्थेवर आधारलेली आहे. तसेच ती यंत्रप्रधान, केंद्रित अशा स्वरूपाची असून ती दोषपूर्ण आहे. बेकारी, अर्धबेकारी, गरिबी, दारिद्र्य, शोषण, कच्चा मालासाठी दुसऱ्या देशांवर अतिक्रमण करणारी किंवा त्यांना अंकित ठेवणारी, वर्गविग्रह करणारी, व्यक्तींना गुलाम बनवणारी, मानवाला यंत्राप्रमाणे वागवणारी, कारखान्यांमध्ये कामगारांना एकाच प्रकारेचे काम देऊन त्यांच्या उदात्त सूक्ष्म भावना नष्ट करणारी अशी केंद्रित स्वरूपाची अर्थव्यवस्था गांधींना मान्य नव्हती. भारतासारख्या राष्ट्रांमध्ये यांत्रिकीकरणाचा स्वीकार करून बेकारी संपुष्टात येणार नाही. भारतामध्ये अनादी कालापासून शेतीवर निर्वाह करणारे करोडो लोक आहेत. त्यासाठी ग्रामस्वराज्य, विकेंद्रित अर्थव्यवस्था, ग्रामोद्योग याचा आपण आधार घेतला पाहिजे. असे गांधीजींचे मत होते. गांधीजी कुटीर उद्योगाचा जो पुरस्कार करतात त्याच्यामागे बेकारी निवारणाच्या बरोबर आर्थिक सत्तेच्या विकेंद्रीकरणाचीही भूमिका होती. गांधीजींच्या मते,

भारतातील खेडी नष्ट झाली तर भारत नष्ट होईल त्यामुळे भारतातील खेड्यांचे जर पुनरुज्जीवन करावयाचे असेल तर त्यांचे शोषण बंद केले पाहिजे. औद्योगिकरणा बरोबर स्पर्धा आणि बाजार यांच्या समस्या जोडलेल्या असतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात औद्योगिकरणामुळे ग्रामीण भागाचे सक्रिय व निष्क्रिय शोषण होणे अपरिहार्य होते. त्यामुळे खेड्यांना स्वावलंबी बनवन्यावर जोर दिला पाहिजे, ते आपल्या उपयोगाच्या वस्तू स्वतः बनवतील ग्रामोद्योगाचे अशा प्रकारे रक्षण केले तर ग्रामवासीयांनी आधुनिक यंत्रांचा व अवजारांचा उपयोग करायला हरकत नाही. त्यांना जे पाहीजे ते बनवू शकतात. मात्र यामध्ये इतरांचे शोषण होऊ नये एवढीच गांधी अपेक्षा व्यक्त करतात.

विकेंद्रित अर्थव्यवस्था ही अहिंसेवर आधारलेली असेल ग्रामीण अर्थव्यवस्थेला गांधी म्हणतात माझी धारणा आहे की त्यामध्ये शोषणाला स्थान नसेल शोषण हे हिंसेचे सार आहे. त्यामुळे तुम्हाला अहिंसक बनवायचे असेल तर ग्रामीण मानसिकता तयार करावी लागेल आणि ग्रामीण मानसिकतेचा अर्थ चरख्यावर श्रद्धा असली पाहिजे. ग्रामीण भागात औद्योगिककरण झाल्यास हस्तकलेचाही विकास होईल. तसेच हस्तकले बरोबरच कलाकौशल्य देखील नाश पावेल असे गांधी स्पष्ट करतात. सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित ग्रामरचना गांधी प्रतिपादित करतात. माणसाचे स्वातंत्र्य त्याची प्रतिष्ठा या बाबी गांधींना अमोल वाटल्या. त्यामुळे गांधी म्हणतात ज्या राज्यरचनेत शासन कमीत कमी असेल ती सर्वोत्तम अशी राज्यरचना होती. गांधींना मुक्तसमाज अपेक्षित होता. केंद्रित राज्यव्यवस्थे ऐवजी विकेंद्रित राज्यव्यवस्थेची त्यांनी आवश्यकता प्रतिपादन केली होती. म्हणून ते म्हणतात, स्वातंत्र्याची सुरुवात खालपासून झाली पाहिजे. प्रत्येक गाव पूर्ण प्रजातंत्र असेल स्वायत्तता आणि स्वशक्तीच्या आधारावर स्वावलंबी आणि परिपूर्ण असे बनेल. जीवनाच्या ज्या कोणत्या गोष्टीची गरज असेल त्या सर्व गावातच उपलब्ध होतील. असे स्वावलंबी गावाचे चित्रण गांधी करतात. ग्रामीण भागाचे पुनरुज्जीवन करायचे असेल तर त्यांचे शोषण थांबवले पाहिजे असे गांधी स्पष्ट करतात. गांधीजींच्या मते, नई तालीम ही शिक्षण प्रणाली देशाच्या वातावरणातूनच निर्माण झाली आहे. देशाच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी ही शिक्षण प्रणाली योग्य आहे. भारतातील सात लाख खेड्यांचा जर आपणाला उद्धार करायचं असेल तर नई तालीम शिक्षणप्रणाली अवलंबली पाहिजे असे ते म्हणतात.गांधीजींच्या मते, शेती, पशुपालन आणि ग्रामीण उद्योग याच्या आधारावर ग्रामीण अर्थव्यवस्था कशाप्रकारे सुधारेल यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

अश्याप्रकारे गांधीजींनी सर्वोदयाची संकल्पना स्पष्ट केली आहे. राज्यसंस्था, कायदे, वर्तमान लोकशाही शासन प्रकार आणि निवडणूका, राजकीय पक्ष इत्यादी संस्थाबाबत सर्वोदयाकडून अविश्वास व्यक्त केला आहे. कारण यांच्याकडून समाजाच्या सर्वच प्रश्नांची समाधानकारक सोडवणूक शक्य नाही. केंद्रीत राज्यव्यवस्था, औद्योगीकरण, यांत्रीकीकरण, नियोजनबद्ध विकासास प्राधान्य, पक्ष यंत्रणा यावर सर्वोदयाने टिका केली आहे. ग्राम जिवन हा भारताचा आत्मा असल्यामुळे सामाजिक, अर्थीक व राजकीय विचाराचा केंद्रबिंदू खेडे असले पाहीजे. खेडे स्वावलंबी, आत्मनिर्भर बनल्यास शासनाची गरज भासणार नाही. अशी अराज्यवादी भूमिका सर्वोदया अंतर्गत गांधी घेतात. समाजात विषमता असणार नाही. श्रमीक लोक विश्वस्त बनतील, सर्वांच्या किमान गरजा भागलेल्या असतील भवितव्याची कोणाला चिंता असणार नाही. त्यामुळे संघर्ष उदभवणारच नाहीत त्यामुळे पाशवी दंडशक्तीची गरज उरणार नाही राज्ययंत्रणा अनावश्यक ठरली की राजकीय पक्षाची गरज उरणार नाही पक्ष पध्दतीतून निर्माण होणारे अनेक व्यवहार आपोआपच बंद होतील असे सर्वोदयाचे तर्कशास्त्र होते. परंतु गांधीच्या हयातीत त्याचे सर्वोदयाचे स्वप्न साकार होऊ शकले नाही.

**संदर्भ ग्रंथ**

1) टिकेकर इंदू, (1979) सर्वोदय क्रांतीचे समग्र दर्शन, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्ट,पुणे.

2) देसाई नारायणभाई,(ऑक्टोबर 2009) अज्ञात गांधी, समकालीन प्रकाशन पुणे.

3) गांधी मो.क.,(2010) माझे सत्याचे प्रयोग, माणिक प्रकाशन, मुंबई.

4) पंडित नलिनी, गांधी, (1983) ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

5) प्रभू आर.के. आणि राव यु.आर.(2010) (अनुवाद- हेडा ब्रिजमोहन) महात्मा गांधींचे विचार, नवजीवन प्रकाशन,मुंबई.

6) कृष्ण कृपलानी, (1994) महात्मा गांधी जीवन चरित्र, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया.

7) पांढरीपांडे सु. श्री. (2010) महात्मा गांधीजींचे हिंदस्वराज्य आणि नवे मन्वंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

8) भोळे भा.ल.(2003)आधुनिक भारतीय राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.